# कॉमिक बुकच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचा जागर

## शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात अभिनव उपक्रम

**कर्मयोगी वृत्तसेवा**
**कराड,दि.१९**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड येथील सायबर शक्ती क्लबतर्फे नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष मनोरंजक सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासन सायबर विभाग तसेच क्विक फाउंडेशन यांचे सहकार्य लाभले. वाढत्या सायबर फसवणुका आणि ऑनलाइन घडणाऱ्या विविध सायबर गुन्ह्यांबाबत नागरिकांना माहिती देणे तसेच त्यापासून सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक खबरदारी समजावून सांगणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.



या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेले 'सायबर जनजागृती अभियान'. या अभियानामध्ये विद्यार्थ्यांनी डॉक्टर, शिक्षक, विद्यार्थी, उद्योजक, वकील तसेच बँक कर्मचारी अशा विविध सामाजिक भूमिकांचे सादरीकरण केले. त्याचबरोबर काही विद्यार्थ्यांनी सायबर हॅकरच्या भूमिका साकारून विविध प्रकारच्या सायबर फसवणुकींचे मनोरंजक पद्धतीने सादरीकरण केले.

विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून डिजिटल अरेस्ट, ऑनलाइन बँकिंग फसवणूक, बनावट लिंक, सोशल मीडिया स्कॅम्स, बनावट कॉल्स आणि इतर आधुनिक सायबर फसवणुकींच्या प्रकारांबाबत जनजागृती करण्यात आली. संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे, अनोळखी व्यक्तींवर विश्वास न ठेवणे, ऑनलाइन व्यवहार करताना सतर्क राहणे तसेच वैयक्तिक आणि आर्थिक माहिती सुरक्षित ठेवणे याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.जे.वाघ यांनी या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेसारख्या महत्त्वाच्या सामाजिक विषयावर घेतलेल्या पुढाकाराचे अभिनंदन केले.

यावेळी सायबर शक्ती क्लब समन्वयक डॉ. प्रियांका शिंदे यांनी आजच्या डिजिटल युगात सायबर सुरक्षा ही केवळ क्षेत्रातील व्यावसायिकांची जबाबदारी नसून प्रत्येक भारतीय नागरिकासाठी आवश्यक बाब असल्याचे सांगितले. इंटरनेट आणि डिजिटल सेवांचा वापर वाढत असताना प्रत्येकाने सायबर धोक्यांविषयी जागरूक राहणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहार करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमादरम्यानकडून नागरिकांना विशेष सायबर जनजागृती कॉमिक पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. मनोरंजक कथांच्या माध्यमातून सायबर फसवणुकीचे प्रकार आणि त्यापासून बचाव करण्याचे मार्ग समजावून सांगणाऱ्या या कॉमिक्समधून नागरिकांना सहज आणि प्रभावी पद्धतीने सायबर सुरक्षेचा संदेश देण्यात आला.

'सायबर सुरक्षित भारताकडे वाटचाल' हा संदेश देत विद्यार्थ्यांनी सादर केलेले हे सायबर जनजागृती अभियान नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे प्रभावी माध्यम ठरले. तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदारीने वापर करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सजग राहावे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. संजीव वाघ, उपसंचालक डॉ.एस.के.पाटील, एम.सी.ए. विभागप्रमुख प्रा. भागवत पाटील, क्लब समन्वयक प्रा.डॉ.प्रियांका शिंदे, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.आळसुंदकर तसेच अधिष्ठाता डॉ. उमेश देशपांडे, अधिष्ठाता प्रा. उमा पाटील, विभागप्रमुख प्रा.सुनील पाटील यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.